साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com



## संपादकीय

## घरोघरी तिरंगा, मनामनात तिरंगा

देशाच्या स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र जनतेच्या देशभक्तीच्या भावना उचंबळून आल्या आहेत.दरवर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र दिन साजरा होता.दरवर्षी देशाचे पंतप्रधान स्वातंत्र्यदिनाला राजधानीतील लालकिल्ल्यावरुन देशाला उद्दे-शून भाषण करतात.पण यंदाचा स्वातंत्र्य दिन देशभर अमृत महोत्सव म्हणून साजरा केला जात आहे.देशाचा उत्सव म्हणून तो साजरा होतोय. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घरघर तिरंगा अशी घोषणा दिली आणि देशवासीयांमध्ये चेतना फुलवली गेली. महानगरातील उत्तुंग टॉवर्सपासून ते झोपडपट्ट्यांपर्यंत, हौसिंग सोसायट्यांपासून ते चाळींपर्यंत, लहान-मोठ्या, उद्योग-व्यापारी समूहांपासन ते छोट्या दुकानदारांपर्यंत, केंद्र व राज्य सरकारच्या सरकारी, निमसरकारी अस्थापना, खासगी कार्यालये, शाळा-महाविद्यालये, विद्यापीठे, अगदी रस्त्यावरील पानटपरीच्या दुकानांपासून ते चहाच्या ठेल्यापर्यंत सर्वत्र भारताचा तिरंगा अभिमानाने फडकताना दिसतो आहे.गणेशोत्सव किंवा दिवाळीच्या सणासुदीच्या काळात जशी विद्युत रोषणाई सर्वत्र इमारतींवर असते, तशीच तिरंग्याची रोषणाई बघायला मिळाली.मात्र सत्ताधारी पक्षाच्याच काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रध्वजाचा अवमान होईल असेही कृत्य केले हे वगळून कसे चालणार. १३, १४ आणि १५ ऑगस्ट रोजी तिरंगा घरोघरी फडकविण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केले व त्याला जनतेने अभूतपूर्व प्रतिसाद दिला. जात, पात, धर्म, पंथ यांच्या भिंती तोडून देशवासीयांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त एकजुटीचे प्रदर्शन घडवले हीच भारताची मोठी शक्ती आहे.गुलामीच्या शृखंला तुटून पंचाहत्तर वर्षे पार पडली. भारताच्या तिरंग्याला मानवंदना देताना या देशाचे आम्ही रक्षण करू, देशाची प्रगती करूआणि देशाला वैभवशाली मार्गावर नेऊ, अशी प्रतिज्ञा प्रत्येक भारतीय नागरिक करीत असतो. ही एकजूट, ऐक्य आणि निश्चय हीच भारताची ताकद आहे.गेल्या पंचाहत्तर वर्षात राज्यांमध्ये आणि केंद्रात वेगवेगळ्या पक्षांची सरकारे आली.कोणालाही देशात मक्तेदारी निर्माण करता आली नाही. काँग्रेसने केंद्रात सहा दशकांहून अधिक काळ सत्ता उपभोगली, पण काँग्रेसला जनतेने विरोधी पक्षात बसवले. वेगवेगळ्या विचारधारेचे पक्ष केंद्रात व राज्यात सत्तेवर येऊनही पंचाहत्तर वर्षात देशाच्या अखंडतेला व सार्वभौमत्वाला तडा गेला नाही,याचे कारण देशाचे संविधान आहे. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाने देश बांधलेला आहे.या देशातील जनतेचा तिरंग्यावर दृढविश्वास आहे. दीडशे वर्षे पारतंत्र्यात काढलेला भारत हा काही सहजा-सहजी स्वतंत्र झाला नाही.त्यासाठी हजारो क्रांतिकारांनी,स्वातत्र्यवीरांनी बलिदान केले,त्याग केला,रक्त सांडले.त्यांनी दिलेल्या स्वातंत्र्य लढ्यातूनच १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला.भारताने ७५ वर्षांत विविध क्षेत्रांत लक्षणीय झेप घेतली.विज्ञान-तंत्रज्ञानात वेगाने प्रगती केली.अंतराळात झेप घेतली.देश अण्वस्त्र संपन्न झाला.एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या.नजीकच्या काळात बुलेट ट्रेन येणार मात्र आजही सर्वसामान्यांना बसायला सर्वसाधारण गाड्यात डब्बे पुरेसे नाहीत हे विसरून कसे चालणार आहे.गरिबांच्या घरोघरी घरगुती गॅस पोहोचला.देशभर रेल्वेचे जाळे निर्माण झाले.जम्मू- काश्मीरमधेही रेल्वेचे जाळे निर्माण होऊ लागले आहे.खासगी क्षेत्राने प्रवेश केल्यापासून देशभर विमान सेवा व प्रवाशांची गर्दी वाढली.संगणकाचा वापर आता शालेय स्तरावर सर्वत्र सुरू झाला आहे.विविध सेवांचे ॲप ही अत्यावश्यक बाब बनली आहे.गेल्या पंचाहत्तर वर्षांत देशाला भ्रष्टाचाराची लागलेली कीड दूर करण्याचा प्रयत्न सुरु झाला असला तरी बेरोजगारीचा भस्मासूर मोठा झाल्याने बेरोजगार युवक नोकरीविना चुकीच्या मार्गावर चाललेला आहे हे तेवढेच महत्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाची सूत्रे आल्यापासून काही गोष्टींवर लगाम जरी लागली असली तरी विरोधी पक्ष महागाई विरोधात बोलतो,त्यावर ते गप्प बसतात.काश्मीरमधील दहशतवाद नियंत्रणाखाली आणल्याचे सांगितले जाते मात्र तो काही प्रमाणात कमी झालेला आहे असे म्हणावे लागेल.जातीपातीच्या व्होट बँक राजकारणातून विरोधी पक्ष बाहेर पडत नाहीत. अनेक पक्ष तर अशा व्होट बँकेवरच आपल्या भाकऱ्या शेकून घेत असतात.परंतु त्याच जात प्रवर्गातील लोकांची जनगणना करायला मात्र पंतप्रधान मोदीजी अमृतमहोत्सवी वर्षात का नकार देतात हे विचारणीय आहे.साक्षरता वाढली, पण गुणवत्ता वाढली पाहिजे. आजही उच्च शिक्षणासाठी आणि चांगल्या जॉबसाठी मध्यमवर्गीयांची मुले युरोप, अमेरिकेत जात आहेत. कारण आपल्याकडे त्यांना पाहिजे तशी संधी मिळत नाही. जम्मू- काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम रद्द करण्याची हिम्मत मोदी सरकारने दाखवली. राम मंदिराच्या उभारणीतील सर्व अडथळे दूर करून त्याच्या उभारणीला सुरुवात मोदी यांच्याच कारकिदीत सुरू झाली.परंतु ओबीसींच्या हितासाठी जे व्हायला हवे होते ते होऊ शकले नाही.मात्र हर घर तिरंगा घर घर तिरंगा करुन ओबीसींच्या संविधानिक अधिकाराचे काय हा प्रश्न आजही तसाच कायमम राहिला आहे.स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षातील ही सर्वात मोठी शोकांतिकाच म्हणावे लागेल.

## शेतकरी पुत्राची नेत्रदीपक कामगिरी

देशातील शेतकऱ्यांची आजची स्थिती पाहता ते मुलांना चांगले शिक्षण तसेच क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी लागणाऱ्या अत्याधुनिक सोयीसुविधा देऊच शकत नाही. अस्मानी व सुल्तानी आक्रमणांना तोंड देत शेतकरी कसाबसा आपल्या संसाराचा गाळा हाकलत असतो. इतरांना जसे आपले मुलं मोठे अधिकारी तसेच इतरही क्षेत्रात नाव कमवावे वाटते. त्याचप्रमाणे शेतकरी मायबापालासुद्धा वाटणे साहाजिकच असते. पण, यात आडकाठी येते ती आर्थिक परिस्थितीची. मात्र, या सर्व अडचणीवर मात करून विपरित परिस्थितीत आकाशाला गवसणी घालण्याचे ध्येय उराशी बाळगून सातत्याने प्रयत्न केल्यास यश गवसणी घातल्याशिवाय राहत नाही, हे तितकेच खरे आहे. आणि हे खरे असल्याचे मांडवा, आष्टी, जिल्हा बीड येथील अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला स्टीपलचेसमध्ये पदक जिंकवून देणारा अविनाश साबळे याने स्वकष्टाने आकाशाला गवसणी घालत कुटूंब, गाव, राज्य तसेच देशाचे नाव उंचावले आहे. प्रवास कितीही मैलाचा असला तरी त्याची सुरुवात शुन्यापासूनच होते. मग ध्येय गाठण्यासाठी शुन्यापासून केलेल्या प्रवासात सातत्य ठेवल्यास आपल्याला यशापासून कोणीही दूर ठेवू शकत नाही, हे अविनाशने सिद्ध केले आहे. त्याच्या या अभूतपूर्व यशातून ग्रामीण भागा-तील मुलांनी प्रेरणा घेऊन परिस्थितीचा बाऊ न करता आवड असलेल्या क्षेत्रात उंच शिखर गाठून स्वत: सिद्ध करण्याची प्रेरणा घेतली पाहिजे. अविनाशचे आई वडील दोघेही शेतात राबराब राबतात.

त्याला बालपणापासूनच धावण्याची आवड होती. त्याला क्रीडा क्षेत्रात करिअर करायचे होते. मात्र, मागे वळून पाहिल्यानंतर घरची बेताची परिस्थितीमुळे क्रीडा क्षेत्रातील महागडी साहित्य, खानेपिणे तसेच इतरही सोयीसुविधांच्या बाबतीत आपण पुरू शकणार नसल्याचे त्याने ओळखून देशसेवेचा मार्ग स्विकारून आमीत नोकरी मिळविली. मात्र, त्याच्यामधील खेळाडू त्याला तिथे त्याला स्वस्थ बसू देत नसल्याने त्याने त्याचा सराव कायम ठेवून आज देशाचे नाव जगभरात केले. शेतात काम करत असताना रौप्य पदक मिळाल्याचा अविनाशचा फोन आला. या यशाने ते हरखून गेले. मुकुंद साबळे यांनी सांगितले की, मला फोन आल्यानंतर खूप आनंद झाला. आपल्या मुलाने खूप मोठे नाव कमावले. जीवनात कधी मुलगा इतकी मोठी कामगिरी करेल असे वाटले नव्हते. आपल्याला मुलाचा अभिमान वाटतो असे त्यांनी बोलून दाखविले. महाराष्ट्रातील शेतकरी पुत्र अविनाश साबळेने इतिहास रचला. कारण, राष्ट्रकुल स्पर्धेत भारताला स्टीपलचेसमध्ये पदक जिंकवून देणारा अविनाश हा पहिला खेळाडू ठरला आहे. त्याचबरोबर अविनाशने राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला असून, रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. अविनाशची ३००० मीटर स्टीपलचेस ही शर्यत चांगलीच रंगतदार झाली. शर्यतीच्या अंतिम फेरीत केनियन खेळाडूंना कडवी टक्कर दिली. अविनाशने ८:११.२० सेकंदाच्या राष्ट्रीय विक्रमी वेळेसह रौप्यपदक जिंकले.

**प्रमोद बायस्कर**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि आम्ही..

## वीरांच्या त्यागाची आणि समर्पणाची सर्वांना जाणीव आहे काय?




यावर्षी भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजेच ७५ वा वाढदिवस आपण आनंदाने देशभरात साजरा करीत आहोत. ही प्रत्येक भारतीयासाठी समाधानाची बाब आहे.

असंख्य वीरांच्या बलिदानानंतर आणि लाखो लोकांच्या त्यागामुळे आपणाला आज हा सुखद दिवस पाहायला मिळाला आहे.त्या लोकांनी जो संघर्ष केला,विरोध पत्करला,कुटूंबाकडे दुर्लक्ष केले,म्हणून आज आम्ही आमच्या कुटूंबासोबत सुखाने झोपत आहोत.त्यांनी जर इंग्रजी सत्तेविरुध्द निकराने लढा दिला नसता तर आज जे लोक सत्तेचा आस्वाद घेत आहेत त्यांना तो मिळाला नसता.त्यामुळे या स्वातंत्र्य सेनानींचे आम्हा प्रत्येक भारतीयावर अनंत उपकार आहेत.ते आमच्याकडून कधीही फिटणार नाही.

त्यामुळे स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाचे बलिदान दिलेल्या या वीरांच्या त्यागाची आणि समर्पणाची आम्ही सर्वांनी जाणीव ठेवली पाहिजे.

तसेच आज ७५ वा स्वातंत्र्य दिन जरी आम्ही आनंदाने साजरा करीत असलो,तरी तो साजरा करण्यासारखी परिस्थिती सध्या देशात आहे का यावरही प्रत्येकाने चिंतन केले पाहिजे.

- स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची जी स्वप्ने आमच्या सेनानींनी पाहिली होती ती खरोखर पूर्ण झालेली आहे का ? भारताने धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना स्विकारली होती.सर्व धर्माच्या लोकांना धार्मिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते.धर्माच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही हे संविधानकर्त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते.परंतु आज तशी परिस्थिती आहे का यावरही मंथन झाले पाहिजे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाची अवस्था फार बिकट होती.शिक्षण हे फक्त मोठ्या शहरांमधेच आणि तेही मर्यादित स्वरुपात होते.ग्रामीण भागातील जनता शिक्षणापासून जवळपास वंचीत होती.आमच्या महापुरुषांनी ही समस्या ओळखली.ग्रामीण भागात शिक्षण पोहचले पाहिजे म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न करुन गावखेड्यापर्यंत शाळा, महाविद्यालये सुरु केली.त्यामुळे ग्रामीण भागापर्यंत शिक्षणाच्या सुविधा पोहचल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर,डॉ.पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या अनेक महापुरुषांनी बहुजनांच्या शिक्षणाची सोय केली.त्यांच्या कष्टामुळे आणि समर्पित वृत्तीमुळे बहुजन समाजाला स्वाभिमान आणि अस्मितेची जाणीव झाली.आज बहुजन समाजातील लोक सर्वच क्षेत्रात मोठमोठया हुद्यांवर विराजमान झालेले आहेत.

परंतु आमच्या महापुरुषांच्या संघर्षाची आणि त्यागाची मात्र त्यांना जाणीव दिसत नाही.साडी,माडी आणि गाडी यामधे ही उच्चशिक्षित मंडळी इतकी रममाण झालेली आहे की त्यांना आपल्या अवतीभवती काय सुरु आहे याकडे लक्ष द्यायलाही वेळ नाही.शोषणवादी व्यवस्थेची ही मंडळी वाहक झालेली आहे.

या देशाला जगविणारा अन्नदाता अत्यंत विदारक अवस्थेमधे आहे याच्याशी त्याला काही देणेघेणे नाही.कष्टकरी,कामकरी,शेतकरी यांच्या आंदोलनाविषयी तो आपले मतही व्यक्त करीत नाही आणि सहभागीही होत नाही.

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्यांनी संघर्ष केला त्यांचे स्मरण करणे हा केवळ आता एक सोपस्कार झाला आहे.आमच्या महापुरुषांच्या विचारांना आम्ही पूर्णतः तिलांजली दिली आहे.त्यांच्या विचारांवर चालणे तर दूरच पण ते विचार समजून घ्यायलाही आम्हाला फुरसत नाही.आमची जबाबदारी,कर्तव्ये आम्ही पूर्णपणे विसरलेलो आहे.आम्हाला फक्त हक्क आणि अधिकारच माहित आहे.परंतु हे हक्क आणि अधिकार सुध्दा ज्या संविधानाने आम्हाला बहाल केले,त्या संविधानाविषयी आम्ही कधी साधी चर्चाही करत नाही.

ज्या संविधानाने आम्हाला सर्व प्रकारचे स्वातंर्त्य बहाल केले,त्या संविधानाबद्दल आम्हाला कोणतीही आस्था आणि आपुलकी नाही.सुशिक्षित समजर्णाय़ा अनेकांनी तर देशाचे संविधानही पाहिले नाही.ज्या संविधानावर हा देश चालतो व जे संविधान आम्हाला जीवन जगण्याच्या संधी बहाल करतो,त्या सर्वोच्च ग्रंथाबद्दल त्याच्या लाभार्थ्यांनाच एवढी अनास्था असणे यापेक्षा दुसरा कृतघ्नपणा कोणता असू शकतो ?

जगातील सर्वश्रेष्ठ लोकशाही म्हणून मान्यता असलेल्या भारतीय लोकशाहीची अमूल्य मूल्ये पायदळी तुडविली जात असतांना उच्चशिक्षित वर्ग मुक्याची आणि बहिऱ्याची भूमिका घेतो.सरकारी स्वायत्त संस्थांचे वेगाने अवमूल्यन होत असतांना आम्ही मूकदर्शक बनतो.एकमेव आशा असलेली न्यायसंस्थाही बड्या लोकांच्या बाजूने झुकत असतांना आम्ही तथाकथित सुशिक्षित लोक बोलायला,लिहायला घाबरतो.मग सुशिक्षित,उच्चशिक्षित असण्याचा उपयोग तरी काय ?

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव धुमधडाक्यात साजरा होत असतांना स्वतंत्र भारताचे स्वतंत्र विचाराचे नागरीक म्हणून आम्हाला जगता येईल का यासाठी आमचा प्रयत्न असणे आवश्यक आहे.स्वतःच्या मेंदूने चिकित्सक विचार न करता केवळ दुर्सय़ांच्या विचारांचे मूक वाहक होणे म्हणजे जीवंत असूनही मृत असल्यासारखेच आहे.आम्ही या देशाचे नागरीक आहोत.स्वातंत्र्यानंतर झालेल्या सुधारणांमधे येथील प्रत्येक व्यक्तीचा काही ना काही वाटा नक्कीच आहे.त्यामुळे राज्यकर्ते कोणत्याही पक्षाचे असो, त्यांना प्रश्न विचारण्याचा आमचा अधिकार आम्ही जरुर वापरला पाहिजे.आमचा प्रश्न विचारण्याचा अधिकार आम्ही कोणाच्याही चरणी गहाण ठेवता कामा नये.भगतसिंग,राजगुरु,सुखदेव यासारख्या क्रांतीकारांनी इंग्रजांना प्रश्न विचारले म्हणून आम्हाला आज प्रश्न विचारण्याचा अधिकार मिळाला.परंतु हा महत्वपूर्ण अधिकारच जर आम्ही गमावून बसलो तर पुन्हा आम्हाला गुलामगिरीच्या वाटेने जावे लागेल.असे जर झाले तर तो समस्त स्वातंत्र्य सेनानींच्या बलिदानाचा अपमान ठरेल. भारतीय स्वातंर्त्याचा अमृत महोत्सव साजरा करतांना आम्ही या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करणे हीच खरी सर्व शहीदांना आदरांजली ठरेल.

**प्रेमकुमार बोके**
**अंजनगाव सुर्जी**
**९५२७९१२७०६**

## राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये २०७१ प्रकरणांचा यशस्वी निपटारा

**गोंदिया-** वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले समोपचाराने व सामजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरीता १३ऑगस्ट रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालत मध्ये २०७१ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गोंदिया येथे तसेच जिल्हयातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये सर्वच प्रकाराच्या तडजोड पात्र न्याय प्रविष्ठ व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरीता तसेच विद्युत व बँक लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

न्या.व्ही.पी.पाटकर अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली तसेच एस.व्ही.पिंपळे,सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,एड.सी. के.बडे, अध्यक्ष, जिल्हा वकील संघ, गोदिया यांचे प्रमुख उपस्थितीत लोक न्यायालयाचे उद्घाटन समाजातील सामान्य घटकाचे प्रतिनिधीत्व करणारे ज्येष्ठ नागरिक दाव्यातील पक्षकार यांचे शुभहस्ते दीप प्रज्वलित करुन करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनांनंतर व्ही.पी.पाटकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया यांनी लोक अदालतीचे फायदे व महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हयातील एकूण न्यायालयात प्रलंबित दिवाणी २२० प्रकरणांपैकी २० प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रूपये १,०६,९१,४३९ वसुलींचे प्रकरणे निकाली निघाले. न्यायालयात प्रलंबित १९४० फौजदारी प्रकरणांपैकी ३३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली व रूपये २,३५,९५,९६७ वसुलींचे प्रकरणे निकाली निघाली. तसेच लोक अदालतमध्ये ठेवण्यात आलेले पुर्वन्यायप्रविष्ठ १४४२५ प्रकरणांपैकी १७१५ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रूपये १,२०,८०,७१० ची वसुली झाली. एकूण ठेवलेल्या प्रकरणापैकी २०७१ प्रकरणे निकाली काढण्यात आली व एकूण रुपये ४ कोटी ६३ लाख ६८ हजार १६६ एवढी वसुली झाली.त्याचप्रमाणे स्पेशल ड्राईव अंतर्गत जिल्हयातील न्यायालयामध्ये एकूण ४११ फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ३२९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. यामुळे ब-याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले आहे. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे विद्युत, पाणी, टेलीफोन, बँक रीकव्हरी यांचे पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबंधित विभागाला जमा केली त्यांची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबंधित विभाग व थकबाकीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याकरीता गोदिया येथे आदिल खान,जिल्हा न्यायाधीश -१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, एन. डी. खोसे,अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश १,एन.बी.लवटे,अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश २,आर.एस.कानडेदिवाणीन्यायाधीश (व.स्तर),ए.व्ही.कुलकर्णी,मुख्य न्यायदंडाधिकारी,श्रीमती. वाय.आर.मुक्कणवार, कामगार न्यायाधीश, कामगार न्यायालय, गोंदिया,एस.आर.मोकाशी,सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,व्ही.ए. अवघडे,सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,कु.पी.एन. ढाणे,२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,गोंदिया,एम.बी.कुडते,३रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,वाय.जे.तांबोली, ४ थे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,एस.डी.वाघमारे,५ वेसह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर, यांनी व गोंदिया जिल्हा वकील संघाचे सचिव एस. आर. बोरकर व इतर पदाधिकारी तसेच पॅनलवरील वकील ॲड. आर. एन. आगाशे, ए. जी. येडे, अल्का उके,व्ही. आर. रहांगडाले, मंगला बन्सोड, कु. आर. आर. कटरे, कु. डी. एल. वालके, कु. डी. आर. मिश्रा, कु. आर. एस. शर्मा, कु. एस. एस. डोये, गोंदिया यांनी सहकार्य केले.

## समूह राष्ट्रगीत गायनासाठी जिल्ह्यातील शाळा झाल्या सज्ज

**गोंदिया :-** भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर "घरोघरी तिरंगा" व इतर उपक्रम आपण मोठ्या उत्साहात साजरे केले. याला जोडूनच अमृत महोत्सवी वर्षानिमित्त १७ ऑगस्ट रोजी संपूर्ण राज्यात सकाळी ११ वा. स्वराज्य महोत्सवाचा भाग म्हणून "समूह राष्ट्रगीत" गायले जाणार आहे. गोंदिया जिल्ह्यात याची जय्यत तयारी सुरू असून या उपक्रमात नागरिकांसह सर्व शाळा हिरीरीने सहभागी होतील, असा विश्वास जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी व्यक्त केला.

स्वराज्य महोत्सवाअंतर्गत समूह राष्ट्रगीत गायनासाठी यशस्वी अंमलबजावणी व्हावी यादृष्टिने सर्व विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. हे समूह राष्ट्रगीत गायन १७ ऑगस्ट रोजी सकाळी बरोबर ११ वा. एकाचवेळी राज्यातील सर्व दूर्गम भागातील पाड्यांसह शहरात गायले जाईल. यासाठी राज्यातील सर्व खाजगी, शासकीय तसेच इतर सर्व प्रकारच्या शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, विद्यापिठे यामधील विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा सहभाग उत्स्फूर्त असणार आहे. सकाळी ११ वा. राष्ट्रगीतला सुरूवात होईल व ११.१ मिनिटामध्ये राष्ट्रगीत गायन करणे अपेक्षित आहे, हे शासनाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

समूह राष्ट्रगीत गायनाचा वेळी जाणते, अजाणतेपणे राष्ट्रगीताचा अवमान होऊ नये याबाबत सर्व स्तरावर काळजी घेण्याचेही आवाहन शासनाने केले आहे. राज्यातील नागरिकांना १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. ते ज्या ठिकाणी असतील त्याठिकाणी थांबून राष्ट्रगीत गायन करण्याचेही आवाहन शासनाने केले आहे.

राज्यातील सर्व खाजगी आस्थापना, व्यापारी प्रतिष्ठाने, संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालय, केंद्र व राज्य शासनाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनीही या उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. राष्ट्रगीत गायनासाठी विद्यार्थ्यांनी मोकळे पटांगण, वर्गखोली किंवा हॉल या ठिकाणी एकत्रीत उपस्थित राहून शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी यांनीही या कार्यक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. ग्रामस्तरावर व शहरात वार्ड स्तरावर सर्व प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांनी सक्रिय सहभाग घ्यावा. यासाठी ग्रामविकास, पंचायतराज विभाग व नगरविकास विभाग यांनी सर्व समन्वयातून हा उपक्रम यशस्वी करायचा आहे.

## मंडल यात्रेचे फलद्रूप



दिनांक एक ऑगस्ट २०२२ ला संविधान चौक नागपूर येथून सुरू झालेल्या मंडल यात्रेचा सात ऑगस्ट २०२२ला दीक्षाभूमी येथे समारोप होऊन, सक्करदरा नागपूर येथील सेवादल महाविद्यालयाच्या सभागृहात समारोपीय कार्यक्रमाची सांगता झाली. ही ऐतिहासिक मंडल यात्रा अनेक अर्थाने ओबीसीच्या चळवळीस बळ देणारी ठरावी असे एकूणच मंडल यात्रेच्या फलद्रूपतेवरुन दिसायला लागते.

ओबीसी तरुणांची प्रेरणादायी मंडल यात्रा विदर्भातील नागपूर येथून मौदा-जवाहरनगर- भंडारा- मोहाडी-तुमसर- सिहोरा- तिरोडा-गोंदिया-गोरेगाव-सडक अर्जुनी-नवेगाव बांध- कनेरी- अर्जुनी मोरगाव- वडसा- ब्रह्मपुरी- नागभिड- f संदेवाही-मूल-चिचपल्ली- बल्लारपूर- चंद्रपूर- वडगाव- ताडाळी- भद्रावती- वरोरा- वणी- मारेगाव- यवतमाळ-देवळी- सावंगी मेघे- वर्धा पवनार- या मार्गे नागपूर दीक्षाभूमी अशी मार्गक्रमण करीत विदर्भातील ओबीसी व्हीजेएनटी समाजात जागृती करून दिली.

ओबीसी युवा अधिकार मंच आणि या यात्रेचे संयोजक उमेश कोरराम यांच्या नेतृत्वातील मंडल यात्रेतील सर्व चमूचे जागोजागी उत्स्फूर्त स्वागत आणि अभिनंदन करून ओबीसी जागृतीचा प्रत्यय येत होता. सात ऑगस्ट १९९० ला प्रधानमंत्री व्ही पी सिंग यांनी मंडल आयोगाच्या मोजक्याच शिफारशी लागू करून सामाजिक न्यायाचा परिचय करून दिला. त्यानिमित्ताने देशभर विविध ओबीसी संघटना सात ऑगस्ट हा दिवस ममंडल दिनफ 'ओबीसी हक्क दिवस' म्हणून साजरा करतात. मंडलची अंमलबजावणी होण्यासाठीही बऱ्याच सामाजिक संघटना, राजकीय आघाडीवरून प्रयत्न झालेत. एकप्रकारे ओबीसीचा दबाव वाढला आणि ओबीसीला आरक्षणाचे लाभ मिळू लागलेत. गेली तीन दशके ओबीसी अल्पशा का होईना




मंडलचे अर्थात आरक्षणाचे लाभार्थी ठरले आहेत. पण ओबीसीला लावलेला सायस्तर- क्रीमीलेयर- आणि मंडलच्या इतर शिफारशींकडे दाखवलेली पाठ त्यामुळे ओबीसींना अजूनही मंडलची आवश्यकता अधोरेखित होते.

विशेषतः विद्यार्थी , शेतकरी आणि कर्मचाऱ्यांना शैक्षणिक प्रशासकीय आणि कृषीविषयक अशा अनेक तरतुदींचा लाभ मिळण्याची प्रतीक्षा अजूनही संपलेली नाही. त्यामुळे सातत्याने ओबीसीत जागृती निर्माण होणेही क्रमप्राप्तच ठरते. ओबीसीला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय आरक्षण मिळाले त्यावरही गंडांतर आलेले असून ते परत न्यायालयीन कात्रीत सापडले. या सर्व प्रश्नांचे उत्तर म्हणजे ओबीसींची जातवार जनगणना होय. ही जातवार जनगणनेची मागणी मोठ्या प्रमाणात ओबीसीमध्ये जोर पकडत आहे. आणि त्या मागणीस ओबीसीच्या अनेक संघटनांचे पाठबळ मिळत आहेत.

मंडल यात्रेच्या निमित्ताने विविध संघटनांना समाजाचे मोठे बळ मिळत असून ओबीसीचा लढा अधिक सघन होत आहे. त्यामुळे या मंडल यात्रेचे ऐतिहासिक महत्त्व राहणार आहे. यात्रेच्या दरम्यान अनेक जुन्या-नव्या आंदोलकांना एकत्र येण्याची संधी मिळाली. नव्वदच्या दशकात मंडल शिफारशी लागू केल्याची घोषणा केली तेव्हा मंडल विरुद्ध कमंडल,अर्थात राम रथयात्रा काढून ओबीसी आरक्षणाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष विरोध केला गेला, आणि ओबीसींना आपल्या न्याय्य हक्कांपासून दूर सारत धार्मिक उन्मादाच्या गर्तेत ढकलण्यात आले. काळ सरकत गेला ओबीसींचे आंदोलन, सामाजिक न्यायाचे आंदोलन एकीकडे चालू असताना दुसऱ्या छावणीने अयोध्याचा मामला, मुस्लिम विरोध, ३७० कलम, आणि बॉम्बस्फोट मालिका इत्यादी मुद्द्यांना हवा देत ओबीसींच्या जीवन-मरणाच्या प्रश्नांवरून समाजाची दिशाभूल केली. तरीही मंडलची आवश्यकता तसूभरही कमी झाली नाही. उलट मंडलच्या अंमलानंतर ओबीसींना ज्या विविध समस्या प्रशासकीय व न्यायालयीन पातळीवर भेडसावत होत्या, त्यामुळे ओबीसी अस्मिता आयडेंटिटी आकारास येऊ लागली.

ओबीसी आंदोलनकर्त्यांच्या सातत्यपूर्ण कार्यामुळे जागृतीचा झोत वाढत राहिला त्याचेच फलित आज देशभर ओबीसीचा मुद्दाच प्रामुख्याने चर्चेत राहतो. त्याची तीव्रता कमी करण्यासाठी प्रसारमाध्यमे आणि ईडीफिडीच्या किडीचे, राजकीय, गैरराजकीय काडीमात्र मूल्याचे मुद्दे फुगवून फुगवून मांडण्याचे कसबी डाव ओबीसीशत्रू रचत असतात. हे सर्व कारस्थान ओबीसींची जनगणना टाळण्यासाठी असून जातवार जनगणना झाल्याशिवाय या समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होणे शक्य नाही, असा एकसूरेल ओबीसी एल्गार विरोधकांना घाम फोडणारा ठरत आहे.

मंडल यात्रेने ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीचे लाभ, वस्तीगृह फी वाढ, शैक्षणिक मार्गदर्शन यासह शेतकरी आणि ग्रामीण ओबीसी बांधवांना मंडलच्या शिफारशींचे महत्त्व समजावून सांगितले. ही उल्लेखनीय बाब ओबीसी नवपिढीसाठी फार बहुमोलाची ठरावी.

समारोपीय कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मंडल चळवळीतील जेष्ठ नागेश चौधरी यांनी मांडलेली भूमिका काही विचारात घेणे खूप आवश्यक ठरते. ते म्हणतात,ओबीसीची गुलामगिरी बळकट ठेवण्यासाठी जी व्यवस्था कारणीभूत आहे ती समजून घेऊन लढ्याची दिशा ठरवली पाहिजे. चातुर्वर्ण्यव्यवस्था, जातीव्यवस्था आणि स्त्री-पुरुष विषमता शाबूत ठेवण्यासाठी अविरतपणे कार्य करणाऱ्यांचे मनसुबे किती खतरनाक आहेत याकडे ओबीसींनी डोळ्यात तेल घालून सावध राहण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष इंजि. प्रदीप ढोबळे यांनी सात ऑगस्ट हा दिवस ओबीसींचा राष्ट्रीय सण म्हणून यापुढे होणार असल्याची घोषणा केली. सात आगस्ट हाच ओबीसींचा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा होईल अशा प्रकारची गर्जना त्यांनी याप्रसंगी करून ओबीसी कार्यकर्त्यांमध्ये आणि विचारवंतांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. ओबीसी लढ्यातील प्रमुख नेते बळीराज धोटे, डॉ. ज्ञानेश्वर गोरे, नितेश कराळे, विलास काळे उमेश कोरराम, प्रा. ज्ञानेश वाकुडकर, खेमेंद्र कटरे, प्रा रमेश पिशे, ज्ञानेश्वर रक्षक, डॉ.अंजली साळवे,स्वागताध्यक्ष संजय शेंडे, ईश्वर बाळबुधे, संध्या राजूरकर, प्रा.अनिल डहाके, दीनानाथ वाघमारे यांनीही ओबीसींच्या वैचारिक लढ्याची पाठराखण केली.

फुले शाहू आंबेडकर विचारधारा, ओबीसीची तमिळनाडूमधील चळवळ आणि द्रमुकचे कार्य ओबीसी चळवळीचा प्राण आहे. तर अवैदिक परंपरा, वारकरी संत संप्रदाय आणि सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळ ही खऱ्या अर्थाने ओबीसींची मुक्तिदायी परंपरा होय. ओबीसीवर होणारा अन्याय, शोषण समजून घेण्यासाठी या देशातील समतावादी विचारांचे पाईक झाल्याशिवाय ओबीसीला पर्याय नाही. ओबीसीच्या जागृत बांधवांचे हे विचार ओबीसी तळागाळापर्यंत सामान्य बांधवांपर्यंत पोचविण्याची सर्वांनी या प्रसंगी मनीषा व्यक्त केली.

गेली सुमारे तीस-पस्तीस वर्षे नेटाने ओबीसी जागृतीचे काम करणारे असंख्य कार्यकर्ते विचारवंत आहेत त्यांच्या कार्याचा प्रातिनिधिक स्वरूपात कृतज्ञतापूर्वक सन्मान नागेश चौधरी, प्रा. नामदेवराव जेंगठे, प्रा. शाम झाडे, भाऊराव राऊत, शैल जेमिनि, यामिनी चौधरी, सुनिता काळे,संध्या राजूरकर, नूतन माळवी, संध्या सराटकर, छाया कुरटकर, डॉ. अशोक चोपडे, अनुज हुलके, पांडुरंग काकडे, गोविंद वरवाडे, डॉ. गुरुदास येडावार,यशवंत सराटकर, विजय बाभुळकर आदि सन्माननीय व्यक्तींचा सत्कार करून ओबीसींचा कार्यांचा याप्रसंगी गौरव करण्यात आला. मंडल यात्रेतील संयोजक उमेश कोरराम आणि सहभागी सर्व चमूनी गत सप्ताहात अपार कष्ट घेऊन मंडल यात्रेचे आयोजन केले. त्यांची प्रशंसनीय कामगिरी ओबीसीला प्रेरणादायी ठरणारी आहे.

**अनुज हुलके**
**नागपूर**

# जिल्ह्यात ठिकठिकाणी स्वातंत्र दिनानिमित्त ध्वजारोहण



**मॉडेल कॉन्व्हेंट एंड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्य दिवस उत्साहात**

**गोरेगाव** – स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त मॉडेल कान्व्हेंट व सायंस कनिष्ठ महाविद्यालयात १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी संस्थेचे संस्थापक प्रा.आर.डी.कटरे, प्राचार्य सौ.सी.पी.मेश्राम ,पर्यवेक्षक कु.एस.डी.चीचामे,आर.बी.कांबळे, आर.बी.कोल्हे,आर.एम.कटरे, पंचायत समिती सदस्य चित्रलेखा चौधरी, धोंगडे ताई, तसेच सर्व शिक्षक वृंद व इतर कर्मचारी,विद्याथी उपस्थित होते. ध्वजारोहण शाळेचे संस्थापक सचिव आर.डी.कटरे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वातंर्त्यदिन निमित्त विद्यार्थ्यांनी रंगारंग कार्यक्रम सादर केले.उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सखी मंच गोरेगांव, निर्मल कॉम्प्युटर गोरेगांव, आईसेक्ट कॉम्प्युटर गोरेगांव, यांच्याकडून वर्ग १० वीतून तालुक्यात प्रथम,द्वितीय, वर्ग १२ वी तून शाळेत प्रथम,द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच ७५ व्या अमृत महोत्सव निमित्त पाहुण्यांच्या हस्ते शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करून करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन कु. वाय. यू. ठाकरे, कु. नमिता के. ठाकूर तर आभार रमेश बी. कोल्हे यांनी मानले.



**नवेगावबांध जि.प.शाळेत माजी सैनिकाच्या हस्ते पार पडले ध्वजारोहण**

**अर्जुनी मोरगाव** – तालुक्यातील नवेगावबांध जिल्हा परिषद क्षेत्रातंर्गत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तसेच ७५ व्या स्वातंत्र दिनी माजी सैनिक प्रभाकर तेजरामजी पुस्तोडे यांच्या हस्ते माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष व विद्यमान जिल्हा परिषद सदस्या रचनाताई गहाणे यांच्या अध्यक्षतेत जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडले.अध्यक्ष स्थानावरुन बोलतानां सौ. रचनाताई गहाणे यांनी नवेगावबांध येतील शालेय व्यवस्थापनात ग्रामस्थाकडुन सहकार्याची अपेक्षा व्यक्तकरीत शाळा नावारुपास येण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.यात ग्रामस्थाच्या सहभागाची अपेक्षाही व्यक्त केली.

ध्वजारोहण कार्यक्रमाला सरपंच अनिरुध्द शहारे,रघुनाथ लांजेवार,प्राचार्य श्री.राठोड,विजय डोये अध्यक्ष शाळा समिती, धनंजय डोंगरवार अध्यक्ष शाळा समिती,नितीन पुगलिया उद्योगपती,बबलु शिपानी,शैलेश जायस्वाल,मुलचंद गुप्ता , परेश उजवने,संजय जायस्वाल,शितल राउत, भिमाबाई शहारे ग्रामपंचायत सदस्य, विजया कापगते ,विशाखा साखरे माजी जि.प सदस्या, खांबायती मडावी माजी सरपंच,समस्त गावकरी , शिक्षक व शिककेत्तर कर्मचारी, अंगणवाडी सेविका,मदतनिस,आरोग्य सेवक सेविका, आशा सेविका उपस्थित होते.



**फुंडे सायंस कॉलेज फूलचूर येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात**

**गोंदिया** – तालुक्यातील फूंडे साइंस कनिष्ठ महाविद्यालय फूलचुर येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे संस्थापक नितिन फुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पररिषदेचे बांधकाम सभापती संजय टेंभरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.तसेच प्रमुख उपस्थितित माजी जि. प. सदस्य राजेश चतुर,अहिल्याबाई खोबरागडे शिक्षण विस्तार अधिकारी,सरपंच मिलन रामटेकर, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक पालकवर्ग, व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उत्सव प्रसंगी उपस्थित होते. तसेच शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करीत असल्यामुळे अहिल्याबाई खोबरागडे शिक्षण विस्तार अधिकारी यांचा सत्कार जि.प.सभापती संजय टेंभरे यांच्या हस्ते श्रीफळ, श्याल आणि स्मृति चिन्ह देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन राहगडाले सर यांनी केले.कार्यक्रमप्रसंगी विद्याथी वेशभूषा करून आले.देशभक्ती गीत, भाषणं सादर करण्यात आले. प्राचर्या श्रीमती एस. एस. फुंडे यांनी आभार व्यक्त केले.



**महावितरण गोंदिया परिमंडळात ध्वजारोहण कार्यक्रम**

**गोंदिया** – महावितरण गोंदिया परिमंडळात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाला अनु-सरून ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहाने करण्यात आला.महावितरण गोंदिया परिमंडळाचे अधिक्षक अभियंता(प्र) शरद वानखेडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देण्यात आला.स्वातंत्र्यांच्या ७५ या दिनानिमित्त बोलतांना श्री वानखेडे यांनी सर्वांना स्वातत्र्य देशाचे महत्त्व व नागरिकांचे आजचे कर्तव्य, यावर विशेष करून संबोधन केले.

या प्रसंगी परिमंडळातील मोठ्या संख्येने अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे विशेष महत्त्व म्हणजे बऱ्याच संख्येने गोंदिया परिमंडळातील अधिकारी कर्मचारी पाऊस सुरु असतांना सुद्धा, कार्यक्रमाला आर्वाजून उपस्थित होते.स्वातंत्र्याचया या अमृत महोत्सव दिनानिमित्त महावितरणच्या गोंदिया परिमंडळ अतिरिक्त सर्व विभागातही स्वातंत्र्य दिवसाच्या कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व हर्ष उल्हासाने आयोजित करण्यात आला होता

**स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत परमात्मा एक सेवकांनी ग्रामपंचायतीला दिली तिरडी भेट**

**सडक अर्जुनी** – तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय डव्वा येथे परमात्मा एक सेवक मंडळाच्यावतीने ग्रामपंचायत कार्यालयाला स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सावाचे औचित्य साधून व पर्यवारणाचा समतोल साधण्यासाठी व गावातील कोणतीही व्यक्ती मृत्यू पावली तर त्यांना कसल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून एक चांगली संकल्पना मांडून आज ग्रामपंचायतला तिरडी भेट दिली.त्यात परमात्मा एक मंडळाचे सेवक चुनिलाल कोसरे, रामलाल सय्याम, तेजराम ठाकरे, देवचंद देशमुख, वाघाडे, बंडूभाऊ रहांगडाले, चेतन चौधरी, वेतन बिसेन, पु-नाजी येल्ले, ऊईकेजी, इत्यांदीनी भेट दिली. तिरडी ग्रामपंचायतीच्यावतीने स्विकारतेवेळी सरपंच पुष्पमाला बडोले,जि.प.सदस्य भूमेश्वर पटले,प.स.उपसभापती शालिंदर कापगते, पंचायत समिती सदस्य चेतन वळगाये, पो-लीस पाटील हुमनरावजी चौधरी, सामाजिक



कार्यकर्ता एफ.आर.टी शहा,विलास चौहान, ग्रामविकास अधिकारी गणेश मुनीश्वर,



लिलेश्वर राहंगडाले,रुपविलास कुरसुंगे,राकेश जैन,सविताताई प्रधान, चंद्रकला येल्ले, बालू रहांगडाले, छाया येल्ले, मीनाक्षी गाते, लीला चौधरी, अंजीरा कवरे, उषा बोरकर, मोरूवाघ-डे, नीलकंठ कटरे, नवीन अग्रवाल, गावातील बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.संचालन ग्रामविकास अधिकारी गणेश मुनीश्वर यांनी तर आभार प्रदर्शन कैलास लाडे यांनी केले.यामुळे तिरडीसाठी लागणारे बांबू वृक्ष तोड होणार नाही.

**राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्यालयात ध्वजारोहण**

**गोंदिया–** स्वातंत्र्यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने शहरातील रेलटोली स्थित पक्षाच्या कार्यालयात माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.तसेच शहरातील विविध ठिकाणी जैन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते जिला मध्यवर्ती सह.बैंक मुख्यालय, शितला माता चौक सिविल लाईन्स, सावराटोली सुरज चौक, बजरंग नगर, गौरी नगर. श्रीमती आनंदीदेवी गोपीलाल अग्रवाल प्राथमिक शाला फुलचुर, रेल्वे वार्ड,जमनालाल बजाज प्रतिमा चौक, झेंडा चौक, न्यु लक्ष्मीनगर. फनीन्द्रनाथ चौक, एन.एम.डी. कॉलेजसमोर,टी.बी.टोली पेट्रोल पम्प यठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाला बहुसंख्येने गणमान्य नागरीक, पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

**ककोडी शाळेत ध्वजारोहण**

**ककोडी–** येथील जिल्हा परिषद हायस्कुल व आरोग्य केंद्रात जिल्हा परिषद सदस्य ऊषाताई शहारे यांचा हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.सरपंच मीनाताई मडावी यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयात भरपावसात ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी उपसरपंच भैयालाल जाभुळकर, डॉ.नदंनी रामटेकेकर, डॉ.कुकडे,सर्व ग्रां.प.सदस्य, शाळा समीतिचे सदस्य नरेन्द साडील, राजु अंबादे, सामाजिक कार्यकर्ते अमरदास सोनबोईर, बबलुजी भाटीया, माजी पोलिस पाटिल शहारे, कमलेश चनाब, दिनादास सोनबोईर उपस्थित होते.आभार मुख्यध्यापक मेश्राम यांनी मानले.

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय- जिल्हाधिकारी नयना गुंडे

**गोंदिया** : जिल्ह्यात शासन व प्रशासनाच्या वतीने सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय व लोककल्याणकारी योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे. स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवी वर्षात सर्वसामान्य नागरिकांचा विकास व जिल्ह्याची प्रगती हेच शासनाने व प्रशासनाचे ध्येय आहे. जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द होऊन जिल्हा अग्रेसर ठेवू या असे प्रतिपादन जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात केले.भारतीय स्वातंर्त्याच्या ७५ व्या वर्धापन दिनाच्या मुख्य ध्वजारोहण समारंभात त्या बोलत होत्या.



मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे व विविध विभागाचे अधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते.

ज्या व्यापक लढ्यातून देशाने स्वातंत्र्य मिळविले, देशासाठी अनेक देशभक्तांनी आपले बलिदान दिले, त्या स्वातंत्र्याच्या इतिहासाला नव्या पिढीपर्यत पोहोचविण्याचे हे पर्व आहे. आपल्या मनात देशाप्रती अधिक कृतज्ञभाव निर्माण व्हावा हा यामागचा हेतू आहे. जिल्ह्यात स्वातंर्त्याचा अमृत महोत्सव अतिशय उत्साहीपणे साजरा केला जात आहे. नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे व देशाप्रती आ-पली कृतज्ञता व्यक्त करावी असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.जनहिताचे निर्णय घेऊन सर्वसामान्य जनता, शेतकरी व समाजाच्या सर्व घटकांच्या विकासासाठी राज्य शासन कार्य करीत आहे. नियमीत कर्ज फेडणा?्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय, पेट्रोल व डिझेलवरील व्हॅट कमी करण्याचा निर्णय, अधिकाधिक जमीन सिंचनाखाली आणण्याचा तसेच प्रलंबीत प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत.

मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात शेती व अन्य बाबीचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अतिवृष्टी ग्रस्तांसाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. दोन हेक्टर ऐवजी तीन हेक्टर मर्यादेत मदत करण्यात येणार आहे. ही मदत एनडीआरएफच्या मदतीपेक्षा दुप्पट मदत असणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील नुकसानग्रस्त सर्व शेतक?्यांना दिलासा मिळणार आहे.राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख रुपयापर्यतचे कर्ज माफ करणारी "महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' अंमलात आणली. जिल्ह्यातील २७ हजार ८७४ शेतकरी या योजनेसाठी पात्र झाले असून त्यापैकी २७ हजार ४०६ शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत ११० कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

जिल्ह्यात शासकीय आधारभुत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत खरीप पणन हंगाम २०२१-२२ मध्ये १०७ धान खरेदी केंद्रामार्फत १ लाख २० हजार ३२३ शेतकऱ्यांकडून ३५ लाख ५६ हजार ७९० क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली. त्यांची आधारभुत किंमत ६९० कोटी रुपये आहे. शासनाकडून ६९० कोटी रुपये प्राप्त झाले असून ६८९ कोटी ३२ लक्ष रुपये शेतकऱ्यांना अदा करण्यात आले.रब्बी हंगाम २०२२ मध्ये १०७ धान खरेदी केंद्रामार्फत ३५ हजार ३१६ शेतकऱ्यांकडून १५ लाख २८ हजार ११५ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे. त्यांची आधारभुत किंमत २९६ कोटी ४५ लाख रुपये आहे. शासनाकडून धान खरेदीची संपूर्ण रक्कम प्राप्त झालेली असून आतापर्यत २०४ कोटी ९२ लक्ष रुपये शेतकऱ्यांना अदा करण्यात आले.


सन २०२१-२२ मध्ये जिल्ह्यात खरीप व रब्बी हंगामात ५० लाख ८४ हजार ९०५ क्विंटल खरेदी झालेली असून राईस मिलर्सकडून ४७ लाख ७३ हजार ८२७ क्विंटल धानाची भरडाई करण्यात आलेली असून उर्वरित धानाची भरडाई सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.जिल्ह्यातील जास्तीत जास्त मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये १ एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत एकूण १५३ कोटी ११ लाख निधी खर्च झालेले असून त्यामधून ६४ लाख ३३ हजार मनुष्य दिवस निर्मिती झालेली आहे. या आर्थिक वर्षात २ लाख ३ हजार ४२८ कुटूंबांना रोजगार पुरविण्यात आलेला आहे.

कोविड लसीचा व्हॅक्सीन अमृत महोत्सवही या निमित्ताने साजरा केला जात आहे. कोरोना महामारीचा संपूर्ण जगाला फटका बसला आहे. कोरोनावर लस हा एकमात्र उपाय असून जे नागरिक बुस्टर डोस घेण्यासाठी पात्र आहेत त्यांनी जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन बुस्टर डोस घ्यावा. ३० सप्टेंबर पर्यत सर्व नागरिकांना बुस्टर डोस मोफत देण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे.कोविडमुळे पती गमावलेल्या ३०४ भगीनींना "मिशन वात्सल्य' योजनेअंतर्गत विविध योजनांचे लाभ देण्यात येत आहेत. या भगीनींच्या पाठीशी प्रशासन भक्कमपणे उभे आहे.

कोविडमुळे दोन्ही पालक गमावलेल्या ११ बालकांना १५ लाखांच्या पॅकेजचे वितरण करण्यात आले. यात ५ लाखाचे मुदत ठेव प्रमाणपत्र, वयाच्या २३ वर्षापर्यंत मासिक विद्या-वेतन, आयुष्यमान भारत योजनेत पाच लाख रुपये विमा आदींचा समावेश आहे.

यासोबत जिल्ह्यात जिल्हा परिषद, कृषी विभाग, आरोग्य विभाग, वन विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग, समाजकल्याण, आदिवासी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर सर्व विभागामार्फत सर्वसामान्यांच्या हिताचे व लोककल्याणकारी योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात येत आहे. स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवी वर्षात सर्वसामान्य नागरिकांचा विकास व जिल्ह्याची प्रगती हेच प्रशासनाचे ध्येय आहे.

जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी कटीबध्द होऊन जिल्हा अग्रेसर ठेवू या असे आवाहन त्यांनी केले.प्रारंभी जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी ध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. उपस्थित पाहुण्यांची त्यांनी सदिच्छा भेट घेतली. ध्वजारोहणानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार केला. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, पत्रकार बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मंजुश्री देशपांडे यांनी केले.



# तिरंगा यात्रेने केला देशभक्तीचा जागर



**गोंदिया** – स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशात ठिक ठिकाणी तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनानुसार भंडारा गोंदियाचे खासदार सुनील मेंढे यांनी आपल्या लोकसभा क्षेत्रात दोन दिवस तिरंगा यात्रा काढली. १३ रोजी जिल्ह्यात आलेल्या या यात्रेमुळे जिल्ह्याचे वातावरण देशभक्तीमय झाले होते. यात्रेत असलेल्या शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाने लोकांची मने जिंकली. भर पावसातही नागरिकांना या तिरंगा यात्रेला भरभरून प्रतिसाद दिला.

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास तरुण पिढीला माहित व्हावा यासाठी तिरंगा यात्रा काढण्यात आली होती. भंडारा येथील हुतात्मा स्मारकाजवळ दिनांक १३ ऑगस्टला जिल्हाधिकारी संदीप कदम यांनी यात्रेला हिरवी झेंडी दाखवून रवाना केले होते. भंडारा शहरातील प्रमुख मार्गावरून भ्रमण केल्यावर लाखनी, साकोली, सौंदड, सडक अर्जुनी, गोरेगाव, गोंदिया अशा विविध ठिकाणी तिरंगा यात्रेचे नागरिकांकडून जोरदार स्वागत करण्यात आले. गोंदिया येथे फुलचुर नाक्यावर कार्यकर्ते व नागरिकांनी तिरंगा यात्रेचे स्वागत केले. शहरात या यात्रेने भ्रमण करून वातावरण देशभक्तीमय केले होते. खासदार सुनील मेंढे यांनी यावेळी नागरिकांना संबोधित केले. शाळकरी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून स्वातंत्र्यवीरांना आपली श्रद्धांजली अर्पण केली. तिरंगा यात्रेदरम्यान बऱ्याच ठिकाणी पाऊसही आला. मात्र, जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या उत्साहापुढे पावसाने हात टेकले. दिनांक १४ ऑगस्ट रोजी गोंदियाहून यात्रा तिरोड्याकडे निघाली. तिरोडा, तुमसर, मोहाडी अशा गावांचा प्रवास करीत यात्रा संध्याकाळी भंडाऱ्यात दाखल झाली व हुतात्मा स्मारकात यात्रेचा समारोप झाला. राष्ट्रध्वज असलेला तिरंगा हा आपला अभिमान आहे व त्याचा मान राखण्यासाठी प्रत्येकाने जागरूक रहावे, असे आवाहन खासदार मेंढे यांनी यावेळी केले. त्याचबरोबर यात्रेत सहभागी सामान्य नागरिक व कार्यकर्ते यांचे आभार मानले.

खासदारांच्या नेतृत्वाखालील या तिरंगा यात्रेमुळे देशभक्तीचा जागर होऊन हर घर तिरंगा घरघर तिरंगा हे अभियान सफल झाले. या संपूर्ण यात्रेत खा.सुनिल मेंढे यांच्या सोबत शिवरामी गिर्हेपुंजे,ाजकुमार बडोले,आमदार विजय रहांगडाले,जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले,रमेश कुथे,बाळाभाऊ काशिवार,गोपाल अग्रवाल,प्रदीप पडोळे, डॉ.लक्ष्मण भगत,मोहन सुरकर,विनोद बांते, धनंजय घाटबांधे,लखन बर्वे,अशोक इंगळे,भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम कटरे, काशीराम टेंभरे,सुनिल केलंका,अशोक लंजे, धनलाल ठाकरे,साहेबलाल कटरे,कल्याणी भुरे,स्वानंद पारधी,गजेंद्र फुंडे,आशिष बारेवार,डॉ.भूमेश्वर पटले,संजय टेंभरे,राजेश चतूर,राजा खान,हिरालाल रहागंडाले,सुरेंद्र बिसेन,मनोज बोपचे,हर्ष मोदी,छायाबाई चव्हाण,कविता रंगारी,विलास चव्हाण,अजाबराव रिनाईत,वसंत भगत,निरज सोनवणे,पिंटु रहागंडाले,मदन पटले,गुड्डू कटरे,तेजेंद्र हरिणखेडे,जगदिश बोपचे,चित्रकला चौधरी,दिपक कदम,भावना कदम आदी मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.



# आरक्षण नाही,तर मतदानही नाही

## ओबीसींना राखीव जागा द्या: कडोतीटोलावासीयांचा निवडणुकीवर बहिष्कार

**सालेकसा:** कडोतीटोला ग्रामपंचायतीच्या निवडणूक प्रक्रियेत ओबीसींना आरक्षणापासून वंचित करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी आरक्षण नाही, तर मतदानही नाही, असा कडक इशारा पत्रकार परिषदेत दिला. त्यामुळे प्रशासनाची भूमिका नेमकी कशी राहील, हे येत्या काही दिवसात कळेल.

ग्रामपंचायत कडोतीटोला येथे २०२२ च्या आगामी सार्वत्रीक निवडणुकीत मागासवर्ग ओबीसींना आरक्षण नाही. मात्र याआधी एक ते दोन जागांसाठी ओबीसींना आरक्षण होते. मग आता का नाही? असा खडा सवालही उपस्थित करण्यात आला. तसा आक्षेपाचा अर्ज जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात आला आहे. कडोतीटोला येथे तीन प्रभाग आहेत.

अनुसूचित जातीची लोकसंख्या ३७६, अनुसूचित जमाती १४३ तसेच नामाप्र ओबीसींची लोकसंख्या २६२ अशी एकूण ७८१ इतकी लोकसंख्या असल्यावर लोकसंख्येच्या प्रमाणात ओबीसी प्रवर्गाची लोकसंख्या २६ टक्केपेक्षा जास्त असून सुद्धा आरक्षण देण्यात आले नाही.

ग्रामपंचायत कडोतीटोला येथील ओबीसी प्रवर्गाची एकही जागा बसत नाही. असा अहवाल तलाठी, ग्रामसेवक व इतर अधिकाऱ्यांनी आरक्षण सोडतीच्यावेळी वाचून सांगितला. हा अहवाल तालुका निवडणूक अधिकारी तथा तहसीलदारांकडे पाठविण्यात आला असेल, असे संजय कोरे व गावकऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जाणूनबुजून ओबीसी प्रवर्गाला निवडणुकीतून डावलण्याचा प्रयत्न होत असल्याचाही आरोप त्यांनी केला. दरम्यान कडोतीटोला येथील जनतेने दिलेल्या आक्षेप अर्जावर लवकरात लवकर कार्यवाही करुन आरक्षण मिळवून द्यावे अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशाराही कोरे यांनी दिला आहे. पत्रकार परिषदेला मंगेश मेंढे, पवन बहेकार, विनोद कोटांगले, लालदास शहारे उपस्थित होते.

# स्वातंत्र्यवीरांचे नेहमी स्मरण करावे – मुकाअ अनिल पाटील



**गोंदिया** – स्वातंत्र्यासाठी अनेकांनी प्राणांची आहुती दिली. आपण जे स्वातंर्त्य उपभोगतोय त्यामागे अनेकांचे त्याग व बलिदान असून, स्वातंत्र्य विरांचे नेहमीच स्मरण करावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

संपूर्ण देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्यापार्श्वभूमिवर गोरेगाव येथील हुतात्मा स्मारकाला १२ ऑगस्ट रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी भेट दिली. त्यावेळी संवाद साधतांना ते बोलत होते. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर उपस्थित होते.

भेटीत त्यांनी शहीद स्मारकांबाबत सरपंच यांना विविध सूचना केल्यात. त्यानंतर कुऱ्हाडी येथील स्वातंत्र्य संग्राम सैनिक शहीद जान्या–तिम्या यांच्या कुटुंबीयांनासुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी भेट दिली. शहीद जान्या–तिम्या यांचे नातू ताराचंद शहारे यांच्याशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या आजोबांच्या स्वातंर्त्य संग्रामातील योगदानाची माहिती घेतली. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. उल्लेखनीय म्हणजे, कुऱ्हाडी येथील शहीद जान्या–तिम्या यांच्या स्मरणार्थ गोरेगावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. दरम्यान,कुऱ्हाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतर्फे काढण्यात आलेल्या प्रभातफेरीतसुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील सहभागी झाले. संपूर्ण देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. देशातील प्रत्येक घरी तिरंगा फडकविण्याचे शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीने आपल्या घरी झेडा फडकवून स्वातंत्र्य संग्राम सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचे आवाहनही त्यांनी याप्रंसगी केले. दरम्यान ग्रामपंचायत कार्यालयात घरकुल बांधकाम, वैयक्तीक शौचालय व सार्वजनिक स्वच्छतेचाही मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी आढावा घेतला.

# गोंदिया/भंडारा जिल्ह्यातील पूरग्रस्तांना शासनाने तातडीने नुकसान भरपाई द्यावी- आमदार डॉ.परिणय फुके

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना पत्राव्दारे केली आर्थिक मदतीची मागणी



**गोंदिया–** गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यात पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदी–नाले उफान वर वाहत असून, पुराचे तेच पाणी घरांमध्ये, गावांमध्ये, शेतांमध्ये शिरले आहे. या गंभीर परिस्थितीचा आढावा घेत परिसरातील आमदार डॉ.परिणय फुके यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पूरग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.पत्रात त्यांनी लिहिले आहे की, दोन्ही जिल्ह्यांतील सर्व तालुके पुरामुळे बाधित आहेत. अनेक गावे अजूनही पाण्याखाली आहेत. पाणी शिरल्याने अनेक घरांची पडझड झाली, गुरे मरण पावली, जीवितहानीही झाली. शेतात पाणी शिरल्याने पिके उद्ध्वस्त झाली आहेत. परिस्थिती चिंताजनक असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.आमदार डॉ.परिणय फुके म्हणाले, अतिवृष्टीमुळे भातशेती, घरे व इतर नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहवाल राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावावर शासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलून दोन्ही जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत द्यावी.

# बंड यांना राष्ट्रपती पदक जाहीर

**गोंदिया:** येथील भारत बटालियन दोनच्या बिरसी कॅम्प येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक देविदास गंगाधर बंड यांना गुणवत्ता पूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे.पोलीस उपनिरीक्षक देविदास गंगाधर बंड हे सशस्त्र पोलीस शिपाई पदावर १ मे १९९९ रोजी राज्य राखीव पोलीस बल, गट नागपूर येथे भरती झाले. अवघ्या दोन वर्षाच्या कालावधीत नक्षल बंदोबस्त मंगेझरी जि. गोंदिया येथे तैनातीस असतांना २० एप्रिल १९९३ रोजी नक्षलवाद्यांनी अचानक घडवून आणलेल्या भुसुरूंग स्फोटात पोलीसांचे एक वाहन नष्ट करण्यात आले.



अशा गंभीर परिस्थितीत त्यांनी नक्षलवाद्यांशी धैर्याने मुकाबला केला. त्यांच्या सहकाऱ्यांना जास्तीत जास्त सुरक्षा दिली आणि शस्त्रास्त्रे वाचवली. या त्यांच्या धाडसापोटी त्यांना राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे.

यापूर्वी त्यांना पोलीस महासंचालक, मुंबई यांनी सन्मानचिन्ह देऊन सन्मानित केले आहे. त्यांना विविध कठीण कर्तव्याबाबत सन २००२ मध्ये आंतरिक सुरक्षा पदक प्रदान करण्यात आले. सन २००३ मध्ये खडतर सेवा पदक प्रदान करण्यात आले. सन २००७ मध्ये गुणवत्ता पूर्ण सेवेबद्दल पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

त्यांच्या ३० वर्षाच्या सेवाकाळात त्यांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बद्दल १५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या ७५ व्या अमृत मोहत्सवाच्या स्वातंत्र्य दिनी गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल पोलीस पदक बहाल करण्यात आला आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले शेतकरी व नागरिक वंचित राहू नये याची दखल घ्या – आ. रहांगडाले



**तिरोडा** – गोंदिया जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे तिरोडा तालुक्यातील चिखली,भिवापूर, गराडा,लोधीटोला,धादरी, उमरी, सोनोली, बिरोली,घाटकुरोडा सह इतर गावात पुराचे पाणी गेल्याने शेती, घरांचे नुकसान झाले असून मोठ्या प्रमाणात पाळीव प्राण्यांची जीवित हानीसुद्धा झालेली आहे. याची दखल घेत तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी पूरग्रस्त गावात जावून तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांची बैठक बोलाविली असून अतिवृष्टी मुळे ज्यांचे नुकसान झाले आहेत त्यांच्या शेतीचे व घरांचे तातडीने पंचनामे करून अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिले या बैठकीमध्ये प्रामुख्याने उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड, जि.प.सदस्या माधुरी रहांगडाले, तुमेश्वरी बघेले, भाजप तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, तहसीलदार प्रशांत घोरुडे, प.स. सदस्या कविता सोनेवाने, गटविकास अधिकारी सतीश लिल्हारे, तालुका कृषी अधिकारी तुमडाम, उपसभापती हुपराज जमाइवार, मंडळ अधिकारी बोडके, संबधीत साझ्याचे तलाठी, ग्राम सेवक, व सरपंच उपस्थित होते.

# टीईटी गैरप्रकाराचे लोण गोंदियातही – ९ परीक्षार्थ्यांवर कारवाई

**गोंदिया–** दोन वर्षापूवी झालेल्या शिक्षक पात्रता परीक्षेतील (टीईटी) गैरप्रकारकेलेल्या उमेदवारांची यादी परीक्षा परिषदेने बुधवारी जाहीर केली. या यादीत जिल्ह्यातील पात्र ठरलेल्या ७३ परीक्षार्थीपैकी ९ परीक्षाथी अपात्र ठरले आहेत. या परीक्षार्थ्यांना यापुढे होणाऱ्या टीईटी परीक्षा देता येणार नसून शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकांना बडतर्फ करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसा सर्व प्राथमिक (इयत्ता पहिली ते आठवी) शिक्षकांकरिता शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने ही परीक्षा इयत्ता पहिली ते पाचवी प्राथमिक वि भाग व इयत्ता सहावी ते आठवी उच्च प्राथमिक विभाग अशा दोन स्तरावर घेण्यात येते.ते यातंर्गत २०१९–२० या वर्षात घेण्यात आलेल्या परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. या गैरप्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खळबळ उडाली होती.

गैरप्रकार केलेल्या परीक्षार्थ्यांची यादी परीक्षा परिषदे बुधवारी जाहीर केली. त्यानुसार ७ हजार ८७४ परीक्षार्थ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत टीईटी परीक्षा दिलेल्या जिल्ह्यातील ७३ परीक्षार्थ्यांपैकी ९ परीक्षार्थ्यांच्या नावे समाविष्ट आहेत.

यात प्राथमिक विभागात रागिणी ताराचंद फेंडारकर, नेहा घनश्याम सोनवाने, महेंद्र भरतलाल मेले, नम्रता देवराम मालाधारी, पुनम विलास ठाकरे, झेबा अंजुम मोहम्मद नईम शेख , सुरेंद्र संतोषदास नागपुरे, दुर्गेश शिवालय लिल्हारे यांचा समावेश आहे. या सर्व परीक्षार्थ्यांना बेकायदेशीर ठरवले आहे.

या परीक्षार्थ्यांची टीईटीची प्रमाणपत्रे रद्द करण्यासह त्यांना पुढील टीईटी परीक्षा देण्यास कायमस्वरुपी प्रतिबंध घालण्यात आला आहे. तसेच शिक्षक म्हणून नोकरी करणाऱ्या या शिक्षकांना सेवेतून बडतर्फची कारवाई करण्याच्या सूचना शिक्षण संचालकांकडून देण्यात आल्या आहेत. यातंर्गत जिल्ह्यातील खासगी शाळेत कार्यरत असलेल्या दोन शिक्षकांवर बडतर्फाची कारवाई होणार असल्याची माहिती जिपच्या उपशिक्षणाधिकाऱ्यांनी दिली आहे.

# पुरग्रस्तांना मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु–जि.प.उपाध्यक्ष गणविर

**अर्जुनी मोरगाव** – स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र गोठणगाव व प्राथमिक आरोग्य केंद्र पवनी धाबे येथील ध्वजारोहण कार्यक्रमाला जात असताना अतिवृष्टीमुळे रस्त्यावर पडलेली झाडे वनविभागाच्या चमुच्या मदतीने मौक्यावर हजर राहून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणविर यांनी रस्ता मोकळा करून घेतला.

तसेच तालुक्यात अतिवृष्टीमुळ मतदरासंघातील कान्होली येथील रमेश रहीले यांच्या पडलेल्या घराची पाहणी करुन तलाठी यांना सुचना करुन पंचनामा करून लवकर मदत मिळवून देण्याचे निर्देश दिले.त्याचप्रमाणे रामपुरी येथील शेती पाण्याखाली आल्याने धानपिकाचे नुकसान झाले त्यापिकांचेही पंचनामे करण्याचे निर्देश देऊन लवकरात लवकर मदत मिळवून देण्याचे आश्वासन पिडीतांना दिले.अतिवृष्टीमुळे गोठणगाव येथील इटियाडोह धरण १०० टक्के भरल्याने त्या धरणाची पाहणी करुन कालव्याशेजारील गावातील नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले.

यावेळी माजी जि.प.सदस्य रतिरामजी राणे,माजी सैनिक निताई मंडल,संजय ईश्वर,कलीराम काटेंगे, अविनाश रहिले, संदिप रहिले,जितु कापगते,देवेंद्र बोहरे तथा नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते.



## अत्याचार प्रकरणाच्या तपासासाठी कमांडट रागसुधा आर गोंदियात

**गोंदिया :** गोरेगाव तालुक्यातील एका ३५ वर्षाच्या महिलेवर सामूहिक अत्याचार करण्यात आल्याची घटना गोंदिया आणि भंडारा या दोन्ही जिल्ह्यांच्या हद्दीत घडली. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेचा सर्वच स्तरातून निषेध व संताप व्यक्त केला जात आहे. दिल्लीतील निर्भया पेक्षाही हे प्रकरण क्रुर असल्याने या प्रकरणाचा तपास एसआयटीच्या माध्यमातून केला जाणार आहे.

# एका महिलेचा मृत्यू तर मलेरियाचे सहा ते सात रुग्ण आढळले



**आमगाव–** तालुक्यातील चिरचाळबांध ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या ससाकरणटोला येथे गावात मलेरियाचे रुग्ण आढळून आले असून एका महिलेचा मलेरियाने मृत्यू झाला आहे . मलेरियाचे दगावलेल्या महिलेचे नाव लीला तुरकर वय ३८ असे असून आरोग्य यंत्रणा खडबडून जागे झाले आहे. त्यामुळे गावात आरोग्य विभागाच्यावतीने शिबिर आयोजित करुन गावातील लोकांची रक्त तपासणी करण्यात आली.या तपासणी दरम्यान गावात पाच ते सहा रुग्ण मलेरिया बाधित असल्याचे आढळून आले आहे. गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चिरचाळबांध उपकेंद्र अंतर्गत ससाकरणटोला या गावात मागील काही दिवसांपूर्वी गावातील काही लोकांना थंडी वाजून ताप आलेला होता. गावातील महिला लीला तुरकर व तीचा मुलगा मोहित तुरकर वय १४ वर्ष यांची प्रकृती जास्त बिघडल्याने यांना गोंदिया येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले तेव्हा त्याना मलेरिया झाल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान १० ऑगस्ट रोजी लीला तुरकर ही दगावली. व मुलगा उपचार घेत आहे. मलेरियामुळे लिलाबाई दगावल्याची बातमी पसरताच आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झाली. आमगाव पंचायत समितीचे सभापती राजेंद्र गौतम , हनुवंत वट्टि जि प सदस्य यांनी तालुका आरोग्य अधिकारी , आरोग्य कर्मचारी, सरपंच यांची बैठक घेऊन ताबडतोब मलेरिया रक्त तपासणी व कोविद शिबिर सुरु केले असून गावात सध्या परिस्थिती आटोक्यात आली आहे.

# ककोडी येथे संततधार पावसाने घर कोसळले

**ककोडी –देवरी परिसरातील ककोडी परिसरात** शनिवारच्या रात्रीपासून सतत मुसळधार पावसामूळे जनजिवन विस्कळीत झाले असून ककोडी येथील वार्ड क्र० २. येथील मालेराव शहारे यांचे राहते घर पडले . यात कोणतीही जिवित हानी झाली नाही.

घर पडले त्या वेळी घरात बाहेरच्या छपरीत मालेराव यांची पत्नी आणि मुलगा जेवण करित असताना मधातल्या खोलीला लागुन असलेली कच्या मातीची भिंत कोसळली.

कोसळलेल्या भिंतीचे आवाज आल्याबरोबर दोघेही बाहेर आले. तत्काळ ग्रांम पंचायतला माहिती दिली, त्यावरुन लगेच तलाठी राऊत यांना माहिती देण्यात आली . आणि पंचणामा करुन



मदतीसाठीचे अहवाल प्रशासनाला पाठविण्याची सुचना करण्यात आली.भर पावसात मालेराव शहारे यांच्या परिवारावर संकट आले असून शासन काय मदत करते याकडे लक्ष लागले आहे.